Coth-25

पुणे येथील मे. जिल्हा न्यायाधिश (कर्मशियल डिव्हीजन) पुणे, यांचे न्यायालयात

कर्मशियल दावा क्र. १५/२०२६

श्री. अरूण पितांबर शेठ ..... वादी

श्व

श्री वासुदेव रामदास भोईर व इतर ..... प्रतिवादी

**दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३२ प्रमाणे नैर्सगिक पालक म्हणून नेमणूक करणे करिता अर्ज**

**सदर कामी वादी तर्फे विनंती अर्ज येणेप्रमाणे :—**

१. सदरचे प्रकरणात प्रतिवादी हजर झालेले आहेत.

२. वादी यांनी दुरुस्तीचा अर्ज केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दिलेले आहे.

३. वादीचे म्हणणे असे की, दि. २८/०४/२०२६ च्या दिलेल्या प्रतिवादी १ ते ३ यांच्या जबाबात प्रतिवादी यांनी असे नमूद केले आहे की, वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३२ मधील तरतुदीचे कोणतेही पालन न करता अगर प्रतिवादी क्र. ४ अज्ञान यांचेकरिता कोणतेही नेक्स्ट फ्रेंड न्यायालयाकडून करून न घेता दुरुस्तीचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

४. वादीचे म्हणणे असे की, वादी व प्रतिवादीमध्ये झालेल्या करारनाम्यात प्रतिवादी ४ म्हणजे ''लिवेद वासुदेव भोईर'' असे नमूद केलेले आहे.

Not Pressed by Plaintiff for Adv for Plaintiff 2/7/2026

५. परंतु वादीने दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी पुरशिस सोबत प्रतिवादी ४ चा जन्माचा दाखला दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र ४ चे नाव ''त्रिवेद वासुदेव भोईर'' असे नमूद केलेले आहे.

६. वादीचे म्हणणे असे की, सदर दाव्यात कोणतीही तांत्रिक चूक अथवा उणीव राहू नये म्हणून वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी ४ त्रिवेद वासुदेव

Seen and filed 2.7.26

भोईर अ.पा.क तर्फे नैर्सगिक पालक म्हणून श्री वासुदेव रामदास भोईर किंवा प्रतिवादी ४ ची आई सौ. मनिषा वासुदेव भोईर यांची नेमणूक करावी.

७. **तरी मे कोर्टास विनंती की,**

अ) सदरचा अर्ज मंजूर करावा व प्रतिवादी ४ त्रिवेद वासुदेव भोईर अ. पा.क तर्फे नैर्सगिक पालक म्हणून श्री वासुदेव रामदास भोईर किंवा प्रतिवादी ४ ची आई सौ. मनिषा वासुदेव भोईर यांची नेमणूक करावी.

ब) इतर योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावेत.

पुणे

दिनांक ०८/०५/२०२६ ~~वादी~~

वादीतर्फे वकील

J. P. Risbud